**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०६ / २०११.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : २० / १२ /२०११.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०६ , बुधवार दिनांक २८ / १२ /२०११.**

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती............................................

सदस्य / सदस्या,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

महोदय / महोदया,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **बुधवार दिनांक २८ / १२ / २०११ रोजी दुपारी १.०० वाजता** माळीवाडा येथील जुने महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. मागील सभा क्र.५ दि.२४/११/२०११ रोजीचे इतिवृत्त.
३. प्रस्तावाची टिप्पणी.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

सभा क्रमांक ०६ बुधवार दिनांक २८ / १२ /२०११ रोजी दुपारी १-०० वाजता होणा-या सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका.

---*---

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| १९ | मागील सभा क्रमांक ५ दिनांक २४/११/२०११ रोजीचे सभेचे इतिवृत्त कायम करणे. |
| २० | दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २१ | सि.स.नं.७४८४ व ३८५० मधील विद्यमान बाळासाहेब देशपांडे हॉस्पीटल पाडून नव्याने अद्यावत हॉस्पीटल खाजगी करणाचे माध्यमातुन उभारणे बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| २२ | सावेडी जॉगींग ट्रॅक मैदान भाडेतत्वावर न देणेबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| २३ | अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदाना बाबत झालेल्या करारनामा व त्याप्रमाणे पात्र प्रत्येकी रु.६०००/- इतका सानुग्रह अनुदान खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| २४ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : २० / १२ /२०११.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १९** **दिनांक : २८/१२/२०११**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** मागील सभा क्रमांक ५ दिनांक २४/११/२०११ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

--**--

**प्रस्तावाचा मजकुर :-** मागील सभा क्रमांक ५ दिनांक २४/११/२०११ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणेसाठी मा.महानगरपालिका सभेपुढे ठेविले.

--**--

**चर्चा :-**

मा.श्री.विनित पाउुलबुधे :- मागील सर्व साधारण सभेमध्ये झालेल्या विषयावरील चर्चेबाबत काय कार्यवाही केली गेली याचे प्रशासनाने उत्तर द्यावे. मागील सर्व साधारण सभेत अधिकारी गैरहजर होते त्यांचेवर काय कार्यवाही केली गेली. नेप्ती नाका ते पत्रकार चौक या रस्त्याचे कामकाजा बाबत चौकशी समिती नेमुन अहवाल दिला जाईल असे सांगितले होते त्यावर आजपर्यंत काय कार्यवाही करण्यात आली.

श्री.मगर शहर अभियंता :- नेप्ती नाका ते पत्रकार चौक या रस्त्यावरील पॅचेस डांबराने बुजून घेण्यात आले आहेत. काही ठिकाणी काम चालू आहे.

मा.श्री.विनित पाउुलबुधे :- नेप्ती नाका ते पत्रकार चौक या रस्त्याबाबत रिपोर्ट ठेवणेबाबत मागील सभेमध्ये सांगितले होते. त्याचे काय केले. त्याबाबत मी पत्र दिलेले आहे. सदरच्या रस्त्याच्या चौकशीच्या अहवालाचे काय झाले. सदर रस्त्याची चौकशी कधी होणार ? कोण करणार ?

श्री.मगर शहर अभियंता :- आपल्या पत्रानुसार सदर कामाबाबत रिपोर्ट तयार केलेला असुन त्यास मंजूरी मिळताच आपणास पत्र देण्यांत येईल. आठ दिवसात आपल्याला पत्र देवू.

मा.आयुक्त :- मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार सदर काम करण्यात आलेले आहे. सदर कामाकरीता एक्सपर्ट नेमुण काम करणे अपेक्षित होते. आपणांस लेखी मागणीनुसार लेखी उत्तर दिले जाईल. सदर कामाबाबत चौकशी पुर्ण न झाल्याने अहवाल आलेला नाही. चौकशी पुर्ण होताच रिपोर्ट येईल.

मा.श्री.विनित पाउुलबुधे :- मा.उच्च न्यायालयाचे आदेश काय आहेत, याची प्रत देण्यात यावी.

मा.आयुक्त :- मा.उच्च न्यायालयाचे आदेश देण्यात यावेत.

मा.श्री.दिलीप सातपुते :- बांधकाम विभागाकडील माहिती मिळणे बाबत दोन महिन्यापुर्वी यादी दिलेली आहे. त्यानुसार अद्यापपर्यंत माहिती मिळालेली नाही.

श्री.मगर शहर अभियंता :- आपल्या यादीतील मागणी नुसार माहिती देण्याकरीता अहवाल ठेवलेला आहे. आपण मोफत माहिती मिळणे बाबत मागणी केलेली आहे. सक्षम प्राधिकरणाची मंजूरी मिळाल्यानंतरच आपणांस माहिती देण्यात येईल.

मा.श्री.विनित पाउुलबुधे :- रस्त्याच्या कामाबाबत संबंधितांना नोटीस देवुन त्यांचा खुलासा मागवावा.

मा.श्री.संजय चोपडा :- प्रश्नोत्तराचा तास घेण्याबाबत यादी देण्यांत आलेली होती. सदर यादीत नमुद केलेले प्रश्न प्रश्नोत्तराच्या तासात का घेण्यात आलेले नाहीत.

श्री.दुर्गे प्र नगरसचिव :- आपल्या यादीत नमुद केलेल्या प्रश्नांबाबतची माहिती ही अनेक विभागांशी संबंधित असल्याने त्यांचेकडुन माहिती येण्यास विलंब झाल्याने प्रश्नोत्तराचा तास घेण्यात आलेला नाही.

मा.श्री.संजय चोपडा :- यादी नुसार माहिती न देणा-या अधिका-यांवर नियमानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

मा.महापौर :- पुढच्या बैठकीत प्रश्नोत्तराच्या तासात माहिती देण्यांत येईल.

मा.श्री.संजय चोपडा :- हडको प्रकाशपूर कॉर्नर ते साधु वासवाणी सोसायटी या रस्त्यास स्व.हारुमलजी हिरानंदानी यांचे नांव द्यावे. एक महिन्यापुर्वी यादी दिलेली आहे. नगरसचिव विभागाकडे पत्र आलेले आहे. सदर यादीनुसार आजपर्यंत नांव देण्याबाबत कारवाई करण्यांत आलेली नाही.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- आगामी पुढील येणा-या बैठकीत सदरचा विषय घेण्यात यावा.

मा.महापौर :- सदर यादी नुसार कारवाई न केल्याबाबत शहर अभियंता यांना नोटीस काढण्यांत यावी.

मा.श्री.विनित पाअुलबुधे :- मा.सर्वसाधारण सभेस गैरहजर असणा-या अधिका-यांवर काय कार्यवाही केली.

मा.आयुक्त :- गैरहजर असणा-या अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस देण्यांत आलेली आहे. रितसर योग्य ते कारण नमुद करुन संबंधितांनी सभेस उपस्थित न राहिल्याबद्दल दिलगीरी व्यक्त केलेली आहे व यापुढे सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू अशा बाबत लेखी दिलेले आहे. यापुढे कुणीही अधिकारी सभेस गैरहजर राहणार नाही. याची दक्षता घेतली जाईल.

मा.श्री.शिवाजी लोंढे :- बैठकीतील प्रश्नांचे निराकरण सभेतच करावयास पाहिजे. केडगांव विभागाकरीता अग्निशमन विभाग सुरु केलेला नाही. सदर बाबत अनेक वेळा वारंवार मागणी करुनही अग्निशमन विभाग सुरु केला जात नाही. यावर काय कार्यवाही केली.

मा.आयुक्त :- नविन फायर फायटरच्या प्रस्तावामध्ये केडगांव विभागाकरीता फायर स्टेशनचा विषय घेतलेला आहे. सद्यपरिस्थिती मध्ये केडगांवला फायर स्टेशन कार्यान्वीत करणे शक्य नाही. त्याकरीता कर्मचारी नाहीत व आवश्यक ती वाहने उपलब्ध नाहीत.

श्री.मिसाळ फा.फा.सुपरिटेंडेंट :- केडगांव विभागाकरीता फायर स्टेशन सुरु करणेकरीता आपल्याकडे पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही. कर्मचारी उपलब्ध झाल्यास फायर स्टेशन सुरु करणे शक्य होईल.

मा.श्री.शिवाजी लोंढे :- सावेडी, केडगांव भागाकरीता शववाहिका ची मागणी केलेली आहे. खरेदी का करण्यांत आली नाही.

मा.उपायुक्त (कर) :- आपल्या मागणी नुसार प्रस्ताव तयार करण्यांत येवून कारवाई करण्यांत येईल.

मा.श्री.शिवाजी लोंढे :- केडगांव विभागातील पाण्याच्या टाक्या व वितरण व्यवस्थेचे कामही अपुर्ण अवस्थेत आहे. बरेच दिवस होवुनही ठेकेदार काम पूर्ण करीत नाही.

श्री.चौगुले :- ओंकार नगर, एकनाथ नगर या भागातील टाक्या व जलवाहिनीचे काम पुर्ण करणे बाबत संबंधित ठेकेदारास सुचना केलेल्या आहेत.

मा.श्री.शिवाजी लोंढे :- केडगांव भागातील ठराविक ठिकाणीच पाण्याच्या लाईन टाकल्या जात नाहीत.

मा.आयुक्त :- अशा प्रकारची कुठलिही तक्रार प्रशासनाकडे आलेली नाही. आवश्यकता पाहुनच पाण्याच्या लाईन टाकण्याचे काम चालू आहे.

मा.श्री.निखिल वारे :- सावेडी विभागातील सर्व्हे नंबर ८७ मध्ये भराव टाकुन ओढा बंद करण्यांत आला होता. सदर भराव काढण्याचे काम केल्या बाबत आभार. महानगरपालिकेचे अधिकारी, पदाधिकारी शासकीय वाहने वापरतात किंवा स्वतःची वाहने वापरुन महानगरपालिके कडुन प्रतिपुर्ती वसुली करतात या बाबतची माहिती दिलेली नाही.

मा.उपायुक्त (कर) :- आपण मागीतलेली माहिती दिलेली आहे. आजच्या सभेस मेकॅनिकल इंजिनियर उपस्थित राहू न शकल्याने माहिती देता येत नाही.

मा.श्री.निखिल वारे :- ज्या पदाधिका-यांना महानगरपालिके मार्फत वाहन सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. असे पदाधिकारी त्या वाहनांचा वापर महानगरपालिकेच्या कामासाठीच करतात का इतर खाजगी कामांकरीता वापरतात याची चौकशी करुन अहवाल देणेत यावा.

मा.उपायुक्त (कर) :- महानगरपालिकेच्या प्रभाग अधिका-यांना वाहने उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहेत. सध्या वसुलीची मोहिम तिव्र स्वरुपात चालु केली असल्याने त्यांना वाहनाची अत्यंत आवश्यकता आहे. वाहनांच्या गैरवापरा बाबत इकडेस माहिती आलेली नाही. माहिती घेवून कार्यवाही करण्यांत येईल.

मा.श्री.निखिल वारे :- महानगरपालिकेच्या पैशातुन सदर गाड्यांचे भाडे जात आहे. सर्व सामान्यांच्या पैशाचा अशा प्रकारे गैरवापर होत नाही काय ?

मा.आयुक्त :- वाहने गैरवापराबाबत चौकशी सुरु केलेली आहे. ऑफिस कामाशिवाय इतरत्र गाड्या वापरण्यास परवानगी दिलेली नाही. वाहनांकरीता संबंधित अधिकारी, पदाधिकारी यांना त्यांचे काम पाहुन प्रत्येक महिन्याला गाडी किती किलोमीटर फिरणे आवश्यक आहे. हे पाहुनच त्यांना त्याची मर्यादा घालुन दिली जाईल. त्या मर्यादेच्या वर जादा किलोमीटर झाल्यास येणारा खर्च संबंधित अधिकारी पदाधिकारी यांच्याकडुन वसुल केला जाईल.

मा.श्री.सचिन पारखी :- शिक्षण मंडळाचे सभापती यांना गाडी उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे. त्यांना गाडीची आवश्यकता आहे काय ? त्या गाडीचा वापर ते शाळेच्या कामासाठीच करतात काय ? महानगरपालिकेच्या शाळा किती व किती अंतरावर आहेत याचा खुलासा करावा. त्यांनी आजपर्यत सदर गाडीमधुन महानगरपालिकेच्या किती शाळांना भेटी दिल्या हे लॉगबुकवरुन सांगावे. सदरची माहिती त्वरीत सभा संपेपर्यंत सभागृहास दाखविण्यांत यावी.

श्री.शिदोरे :- ठराव क्रमांक ८ दिनांक ३०/०५/२००६ रोजी ठराव करुन सर्वसाधारण सभेने गाडी उपलब्ध करुन दिलेली आहे. महानगरपालिका मालकीच्या एकुण १२ शाळा आहेत. शाळा भेटीसाठी गाडीचा वापर करण्यांत येतो.

मा.सौ.क्रांतीकला अनभुले :- महानगरपालिके मार्फत कुठल्याही सार्वजनिक सुविधा योग्य प्रकारे मिळत नाहीत. महानगरपालिकेकडे कर्मचारी नाहीत. वॉर्डात कचरा गोळा करण्यासाठी घंटा गाडी सुध्दा येत नाही. साफसफाई व्यवस्थित केली जात नाही. महानगरपालिकेची कुठलेही उद्यान सुस्थितीत नाही. सर्व बागा उजाड झालेल्या आहेत. वॉर्डातील गटारी तुंबलेल्या आहेत. अतिक्रमण काढलेल्या ठिकाणी पुन्हा तेथिल नागरीक अतिक्रमण करुन बांधकामे करतात. कुठलिही सुविधा चांगल्या प्रकारे मिळत नाही.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे / मा.श्री.संजय चोपडा :- महानगरपालिका सभेचे रेकॉर्डींग करण्या ऐवजी संपुर्ण सभेचे व्हीडीओ शुटींग करण्यांत यावे.

मा.सौ.संगिता खरमाळे :- सावेडी भागातील ज्या घरांचे रिव्हीजन झालेले नाही त्या ठिकाणी आपले वसुलीचे कर्मचारी नळ कनेक्शन तोडण्यासाठी गेले होते.

मा.श्री.शिवाजी लोंढे :- केडगांव विभागात कच-यासाठी कचरा गाडी येत नाही. साफसफाई होत नाही. रस्त्यावरील सर्व लाईटस बंद आहेत. उद्यान विभागाकडुन वृक्ष लागवडीसाठी दोन हजार झाडांची मागणी करण्यांत आली होती ते सुध्दा मिळालेले नाहीत.

मा.सौ.संगिता खरमाळे :- सावेडी विभागातील कार्यरत कर्मचा-यां बाबत माहिती देण्यांत यावी. उपनगरामध्ये कोणकोणत्या कामांसाठी किती कर्मचा-यांची नेमणूक करण्यांत आली आहे. याची माहिती द्यावी.

मा.उपायुक्त (कर) :- सावेडी विभागात उद्यान विभागाकडे ६० कर्मचारी आहेत.

मा.श्री.विनित पाउलबुधे :- उद्यान विभागाकडे ६० कर्मचारी आहेत तर गार्डनची अशी अवस्था का झाली ? कर्मचारी काम करतात का ?

श्री.तडवी प्रभाग अधिकारी :- सावेडी विभागात फक्त उद्यान विभागाकडे तीन कर्मचारी आहेत.

मा.श्री.निखिल वारे :- सावेडी प्रभागातील किरकोळ कामांसाठी वारंवार मागणी करुनही प्रभाग अधिका-यांकडुन कर्मचारी मिळत नाहीत.

मा.सौ.आशा कराळे :- तीन वर्षापासुन माझ्या वॉर्डात महानगरपालिकेचे कर्मचारी आलेले नाहीत.

मा.सौ.किरण उनवणे :- १५ दिवसा पुर्वी नाताळचा सण असल्याने गवत झाडे झुडूपे काढणे करीता उद्यान विभागाकडील कर्मचा-यांची मागणी करण्यांत आली होती. अद्यापपर्यंत कर्मचारी मिळालेले नाहीत.

मा.श्री.बाळासाहेब पवार :- कोणत्याही विषयावर सभेमध्ये चर्चा होते झालेल्या चर्चेप्रमाणे सदर विषयावर कारवाई होत नाही. अधिकारी सभेत विचारलेली माहिती व्यवस्थीत देवू शकत नाहीत. लेखी माहिती बरोबर ठेवत नाहीत. प्रत्येक विभाग प्रमुख आपल्या विभागाची जबाबदारी स्विकारणार नाहीत का ? वायरमन नाहीत, बांधकाम विभागाकडेही कर्मचारी नाहीत.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- गार्डन विभागाकडे कर्मचारी असतांनाही खाजगी कर्मचारी लावुन कामे करुन घेतली जातात.

श्री.तडवी प्रभाग अधिकारी :- सावेडी बांधकाम विभागाकडे सहा कर्मचारी आहेत. त्यातील अतिक्रमण मोहिमेसाठी तीन कर्मचारी दिलेले आहेत. उर्वरीत पैकी एक कर्मचारी निलंबित आहे. अपु-या कर्मचारी संख्येमुळे सावेडी प्रभागातील निघणारी किरकोळ कामे करता येत नाहीत. कर्मचारी मागणी बाबत यापुर्वी आस्थापना विभागाकडे वेळोवेळी मागणी देण्यांत आलेली आहे. अद्यापपर्यंत सावेडी विभागाकडे कर्मचारी देण्यांत आलेले नाहीत. अपु-या कर्मचारी वर्गामुळे सर्व कामे वेळेत पुर्ण करणे अशक्य आहे.

मा.श्री.विनित पाउलबुधे :- प्रभाग अधिका-यांनी वारंवार मागणी करुनही कर्मचारी का उपलब्ध करुन दिले जात नाहीत. याबाबत आस्थापना प्रमुखांनी माहिती द्यावी.

श्री.अंबादास सोनवणे, आस्थापना प्रमुख :- सावेडी प्रभाग अधिका-यांनी कर्मचारी मागणी बाबत इकडेस लेखी दिलेले आहे किंवा नाही हे सांगता येत नाही. मागणी केलेली असल्यास त्यांना वाढवुन कर्मचारी देण्याबाबत कार्यवाही केली जाईल. प्रभाग अधिका-यांच्या लेखी मागणी बाबत एक तासात माहिती मिळवुन देतो.

मा.श्री.विनित पाउलबुधे :- आपण आस्थापना प्रमुख असतांना प्रभाग अधिका-यांनी कर्मचारी मागणी बाबत केलेला अर्ज आपल्या विभागाकडे आलेला आहे किंवा नाही हे सुध्दा आपणांस खात्रीपुर्वक सांगता येत नाही. खातेप्रमुखांनी अशा प्रकारची उडवा उडवीची उत्तरे सभागृहात देणे योग्य नाही. संपुर्ण माहिती व अभ्यासासह सर्वसाधारण सभेस उपस्थित रहावे. अशी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने श्री.सोनवणे यांना तात्काळ निलंबित करण्यांत यावे.

मा.श्री.अनिल शेकटकर :- आरोग्य विभागाकडे बरेचशे कर्मचारी निलंबित आहेत. काही गैरहजर आहेत तर त्यांना कामावर हजर करुन घ्यावे.

मा.उपायुक्त (सा) :- सावेडी प्रभागातुन कर्मचारी काढुन घेतलेले आहेत. सावेडी प्रभाग अधिका-यांचा कर्मचारी मागणी बाबत प्रस्ताव आलेले आहेत. परंतु सध्या अतिक्रमण मोहिम चालू असल्याने त्यांना कर्मचारी देता आलेले नाहीत. अतिक्रमण मोहिम संपताच त्यांना अतिक्रमण विभागाकडील व इतर विभागाकडीलही कर्मचारी देण्यांत येतील. प्रत्येक वॉर्ड ऑफिसर्संना कर्मचारी दिले जातील.

**ठराव :-** मागील इतिवृत्त कायम करणेस ही सभा मंजुरी देत आहे. नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

सुचक : मा.श्री.सातपुते दिलीप नानाभाउ

अनुमोदक : मा.श्री.लोंढे शिवाजी बाळासाहेब

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक : २०** **दिनांक : २८ /१२ /२०११**

---

**प्रस्तावाचा विषय :** दुखवट्याचा प्रस्ताव.

| अ.नं. | विषय |
|---|---|
| १ | भाउसाहेब फिरोदिया हायस्कुलचे विनायक कुलकर्णी यांचे बुधवार दिनांक ०७/१२/२०११ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २ | पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या मातोश्री गायत्रीदेवी प्रमलेश्वर बॅनर्जी यांचे शनिवार दिनांक १७/१२/२०११ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३ | अहमदनगर येथील सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्या प्यारीबाई कनकमल कटारिया यांचे सोमवार दिनांक १२/१२/२०११ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ४ | डॉ.विक्रम रमेशचंद्र काळे यांचे रविवार दिनांक ११/१२/२०११ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ५ | सामाजिक कार्यकर्ते मारुती सोनबा भांबरकर यांचे शुक्रवार दिनांक १६/१२/२०११ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ६ | हिंदी चित्रपट व्यवसायातील प्रसिध्द सिनेअभिनेते देवआनंद यांचे रविवार दिनांक ०४/१२/२०११ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ७ | दिनांक ०९/१२/२०११ रोजी कोलकत्ता येथील एम आर आय रुग्णालयात अचानक झालेल्या अग्नितांडवात सुमारे ९३ जणांचा मृत्यु झाला त्यांचे दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ८ | अनिल रामचंद्र बारस्कर यांचे बुधवार दिनांक २१/१२/२०११ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ९ | ज्येष्ठ रंगकर्मी व प्रसिध्द नाट्य कलाकार पं.सत्यदेव दुबे यांचे मुंबई येथे रविवार दिनांक २५/१२/२०११ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १० | बंगळूरु कर्नाटक राज्याचे माजी मुख्यमंत्री एस.बंगारप्पा यांचे सोमवार दिनांक २६/१२/२०११ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ११ | पुंडलिक भोसले यांचे मंगळवार दिनांक २७/१२/२०११ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १२ | मालती वसंतराव मुळे यांचे मंगळवार दिनांक २७/१२/२०११ रोजी झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |

**ठराव :-** दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक : २१** **दिनांक : २८ / १२ /२०११.**

---

**प्रस्तावाचा विषय :** सि.स.नं.७४८४ व ३८५० मधील विद्यमान बाळासाहेब देशपांडे हॉस्पीटल पाडून नव्याने अद्यावत हॉस्पीटल खाजगी करणाचे माध्यमातुन उभारणे बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

-- ** --

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :** मा.महापौर यांची दिनांक २९/१०/२०११ रोजीची यादी.

मा.महापौर साहेब यांनी महानगरपालिकेच्या मालकीच्या कै.बाळासाहेब देशपांडे हॉस्पीटलला भेट दिली असता इमारतीचा काही भाग धोकादायक झालेला असुन तो उपयोगात येत नसल्याने सदर जागा खाजगी करणाचे माध्यमातुन विकसीत करणे बाबत सुचित केलेले आहे.

कै.बाळासाहेब देशपांडे हॉस्पीटलची अस्तीत्वातील इमारत जागेवर तळमजला + दोन मजले असुन त्याच इमारतीचा वापर सध्या शहरातील महिलांसाठी प्रसुतीगृह व त्या बरोबर महानगरपालिका मालकीची रक्तपेढी तसेच काही भागामध्ये कर्मचारी निवास म्हणुन वापर होत आहे.

सदरची जागा अहमदनगर शहराच्या दुस-या सुधारीत विकास योजनेमध्ये अस्तीत्वातील म्युनिसिपल हॉस्पीटल म्हणुन दर्शविलेली आहे. सदर जागेचा सिटी सर्व्हे नंबर ७४८४ असुन त्याचे क्षेत्रफळ १११४.८० चौ.मी.एवढे आहे. सदरची जागा ९.०० मी. पेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्या सन्मुख असल्याने त्यास चटई निर्देशांक २ अनुज्ञेय आहे.

तसेच त्यालगत सि.स.नं.३८५० ही महानगरपालिकेचे मुळ कार्यालय जेथे आता दवाखाना व कर्मचारी निवासस्थाने आहेत. त्या जागेचे क्षेत्रफळ ७४८.३० चौ.मी.एवढे आहे. त्यास चटई निर्देशांक १.५ अनुज्ञेय आहे. याच दोन्ही जागेचे एकत्रीकरण सिटी सर्व्हे विभागाकडून करुन घेतल्यास त्याचे एकुण क्षेत्रफळ १८६३.१० चौ.मी. म्हणजेच २०,०४७.०० चौ.फुट एवढे येते. एकत्रीकरणानंतर संपुर्ण जागेचा चटई निर्देशांक २ अनुज्ञेय होईल. म्हणजेच सदर जागेवर ४०,०९४.०० चौ.फुट एवढया क्षेत्रफळाची एकत्रीत इमारत उभारता येईल.

नियोजीत इमारतीमध्ये १.५% क्षेत्रफळ E.P - ६२ प्रमाणे वाणिज्य व उर्वरीत जागेत रक्तपेढी, म्युनिसिपल दवाखाना (प्रसुतीगृह) व खाजगी करणाच्या माध्यमातुन विकसीत करावयाचे झाल्यास विकासकास महानगरपालिकेचे आवश्यकते व्यतिरिक्त उर्वरीत जागा हॉस्पीटल या कारणासाठी विकसीत करता येईल. ४०,०००.०० चौ.फुट एवढी इमारत बांधण्यासाठी महानगरपालिकेला सध्या निधी अंदाजे ५.०० कोटी एवढा लागेल. तो सध्या महानगरपालिका उपलब्ध करु शकणार नाही. त्यासोबत फर्निचर व मशनरीसाठी सुध्दा मोठा खर्च लागणार आहे.

त्यामुळे उपलब्ध जागेच्या १५% वाणिज्य रक्तपेढी व महानगरपालिकेच्या आवश्यकते प्रमाणे प्रसुतीगृह या वापरा व्यतिरिक्त उर्वरीत जागेवर प्रसुतीगृह वगळुन दवाखाना खाजगी विकासका मार्फत उभारणे बाबत निर्णय घेणेसाठी तसेच बी.ओ.टी. च्या माध्यमातुन जागा विकसीत करणेसाठी मा.आयुक्त व मा.महापौर यांना विकासकाशी आवश्यक त्या वाटाघाटी करणेसाठी नेमणेबाबतचा निर्णय घेणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.महासभेसमोर ठेवणे उचित होईल.

निर्णयास्तव सादर.

यावर मा.आयुक्त सो यांचा अभिप्राय की, धोरणात्मक निर्णयाकरीता मा.महासभेपुढे ठेवा.

यावर मा.महापौर यांचा अभिप्राय की, सदर प्रस्ताव निर्णयास्तव मा.महासभेपुढे ठेवणेत यावा.

**चर्चा :-**

मा.सौ.गिरजाबाई उडाणशिवे :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना हा गोरगरीबांचा दवाखाना असुन सदर दवाखाना पाडल्याने गरीब लोकांची गैरसोय होईल. कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना दुरुस्त करा.

रंगरंगोटी करा त्यावर पाहिजे तसा खर्च करा पण सदरचा दवाखाना पाडू नका. नगरशहरात गोरगरीब जनतेसाठी याशिवाय दुसरा कोणताही कमी खर्चातील दवाखाना नाही.

मा.सौ.संगिता खरमाळे :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याचे नुतणीकरण करतेवेळी सदर अस्तित्वातील असणारे बांधकाम पाडू नये जागा निश्चित करुन त्या ठिकाणी सद्य स्थितीत असणारी मशिनरी ठेवण्यांत यावी.

मा.सौ.मालनताई ढोणे :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याचे नुतणीकरण करतांना इतर ठिकाणी स्थलांतर झाल्यानंतर व नियमित रुग्णसेवा चालू झाल्यानंतर काम सुरु करावे. सदर कामाकरीता चांगल्या प्रकारे अनुभव असणारे आर्किटेक्ट नेमण्यांत यावेत. सदरच्या खर्चास मंजूरी देण्यांत यावी. बांधकाम मुदतीत पुर्ण करावे. अन्यथा सदर ठेकेदारास दंडाबाबत तरतुद करण्यांत यावी. डिपॉझिट ठरविणे करीता सदरचा विषय मा.स्थायी समिती कडे पाठविणेंत यावा. सदर बांधकामाकरीता समिती नेमावी. त्या समिती मध्ये प्राधान्याने महिला सदस्य घ्याव्यात.

मा.श्री.संजय चोपडा :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यासाठी असणारी जागा त्यावेळी श्री.देशपांडे यांनी दिलेली आहे. सदरचा प्रकल्प बीओटी तत्वावर देता येत नाही. सदर जागेचा कमर्शियल वापर करता येत नाही. अपुर्ण प्रस्ताव नगरसेवकांना देण्यांत आलेला आहे. दरवर्षी अंदाजे चार ते पाच हजार रुग्ण या ठिकाणी आरोग्य सेवेचा लाभ घेतात. गोरगरीबांना या ठिकाणी अत्यंल्प किमतीत सवलती मिळतात. याठिकाणी ब्लडबँकेची सुविधा आहे. ब्लडबँकेची शिप्टींग कसे करणार. ब्लडबँकेसाठी शासनाचे अनेक जाचक नियम अटी आहेत. त्याची पुर्तता कशी होणार तसेच दवाखान्या शेजारीच कर्मचा-यांचे राहण्यासाठी कर्मचारी वसाहत आहे. त्या कर्मचा-यांचा राहण्याचा प्रश्न कसा सोडवणार ? महानगरपालिका मालकीचे इतरही ठिकाणी मोठमोठे भुखंड रिकामे पडलेले आहेत. ते विकसित करुन त्याठिकाणी आरोग्य सेवा देण्याबाबत प्रकल्प राबवावेत. पुढील सभेत संपुर्ण कामकाजाची व्हीडीओ शुटींग करण्यांत यावी.

मा.श्री.विनित पाउलबुधे :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना हा प्रकल्प बीओटी वर देण्याची आवश्यकता का आहे. या दवाखान्या मार्फत गोरगरीबांची सेवा केली जाते. या ठिकाणी नैसर्गिक प्रसुती केली जाते. त्यामुळे याठिकाणी येणा-या रुग्णांचा कल वाढलेला आहे. इमारत जुनी आहे पण चांगली आहे. त्याठिकाणी असणा-या संपुर्ण इमारतीचा पाहिजे त्या प्रमाणात योग्य प्रकारे उपयोग केला जात नाही. काही भागात रद्दी भंगार साहित्य पडलेले आहे. संपुर्ण इमारतीचा पुर्ण क्षमतेने वापर करावा. रुग्णांसाठी ज्या शांत वातावरणाची आवश्यकता आहे ते वातावरण त्या भागामध्ये निश्चितच आहे. त्याठिकाणी कमर्शियल वापर सुरु केल्यास तेथील शांतता भंग होवुन त्याचा रुग्णांच्या प्रकृतीवर निश्चितच परिणाम होईल. इमारती मधील स्ट्रक्चर बदल करावा तेथील ब्लड बँक शिफ्टींग करणे अतिशय अवघड आहे. शासकीय नियम निकषानुसार ब्लडबँक शिफ्ट करावी लागेल. ब्लड बँकेमध्ये ब्लड सेल्स दिले जातील अशा प्रकारे कार्यवाही करावी. आहे त्याच ठिकाणी सुधारणा करुन जनतेस सोयी सुविधा चांगल्या प्रकारे उपलब्ध करुन दिल्या जातील ते पहावे. उपनगरात सावेडी, केडगांव, सारसनगर, कल्याण रोड येथेही महानगरपालिकेचे मोठमोठे भुखंड पडलेले आहेत.

अशाच एकएका भुखंडावर कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यासारखे प्रकल्प सुरु करावेत. केडगांव विभागातील रुग्णास कै.बा.दे.दवाखाना लांब अंतरावर आहे. त्याचठिकाणी त्यांच्याच भागात चांगल्या प्रकारे दवाखान्याची सुविधा असल्यास रुग्णांस लांब अंतरावर येण्यासाठी होणारा त्रास वाचेल. अशा प्रकारे दवाखान्याचे प्रस्ताव तयार करा मा.शासनाची मंजूरी घ्या. दवाखान्याच्या सुरक्षितते करीता सिक्युरिटी नेमा. महानगरपालिकेने यापुर्वी शहरातील चांगल्या चांगल्या जुन्या मोठमोठया वास्तु पाडुन जमिनदोस्त करुन आजमितीस तशाच ठेवलेल्या आहेत. या ठिकाणी नियोजित केलेल्या कोणत्याही प्रकल्पास अद्यापपर्यंत

सुरुवात केलेली नाही. कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना कामकाजास या विषयास माझा पुर्ण विरोध आहे. प्रस्ताव मंजूर करु नये. नगरसेवकांची एक कमिटी बनवा विचारविनिमय करुन पुढील दिशा ठरवावी.

मा.श्री.निखिल वारे :- मा.श्री.विनिती पाउलबुधे यांनी कै.बा.दे.दवाखाना बांधकामा बाबत केलेल्या विरोधास मी व माझ्या कॉग्रेस पक्षाच्या वतीने अनुमोदन देत आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- चालू वर्षाचा जकात प्रिमियम दोन कोटी आला आहे या रक्कमेतुन महानगरपालिकेने स्वतः बांधकाम करावे. बीओटी तत्वावर दिल्यानंतर १५ टक्के वाणिज्य बांधकामावर महानगरपालिकेचे काम होईल काय ?

श्री.निकम नगररचनाकार :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याची जागा २० हजार स्क्वेअर फुट आहे. ही महानगरपालिकेच्या मालकीची जागा आहे. या जागेचा दुसरा वापर करता येणार नाही. दवाखान्यासाठीच वापरावी लागेल. १५ टक्के एफएसआय कमर्शियल करता येईल.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- बीओटी तत्वावर न बांधता महानगरपालिकेने स्वखर्चावर बांधावे.

मा.श्री.विनित पाउलबुधे :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याच्या इमारतीस धक्का न पोहोचता काम करावे.

मा.महापौर :- सदरचा विषय स्थगित ठेवण्यात येत आहे.

मा.श्री.सचिन पारखी :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याच्या बांधकामाचे संपुर्ण प्रस्तावासह सादरीकरण करण्यात यावे.

**ठराव :-**

सभागृहामध्ये झालेल्या सविस्तर चर्चेनुसार ही सभा पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे. कै.बाळासाहेब देशपांडे हॉस्पीटल नव्याने अद्यावत हॉस्पीटल खाजगी करणाच्या माध्यमातुन उभारणे हा विषय स्थगीत ठेवणेत यावा.

तसेच सभागृहातील मा.सदस्य यांच्या भावना लक्षात घेता सदर हॉस्पीटलच्या वास्तुची शहर अभियंता व संबंधित अभियंता यांनी पाहणी करावी. महानगरपालिकेचे एकमेव प्रसुती रुग्णालय असलेने येथे दाखल होणा-या रुग्णांची गैरसोय होणार नाही याबाबी विचारात घेवुन आवश्यकते नुसार हॉस्पीटल मधील ज्या भागांचे बांधकाम करणे तसेच नुतणीकरण करणे याबाबत कार्यवाहीसाठी संबंधित कामांचा सविस्तर व खर्चासह प्रस्ताव तयार करावा.

सदर प्रस्ताव निधी उपलब्धतेसाठी आवश्यक ती तरतुद करणेस्तव सन २०१२ - २०१३ या अंदाजपत्रकाच्या सभेपुढे सादर करणेच्या दृष्टीने उचीत कार्यवाही करणेत यावी.

सुचक : मा.श्री.बोराटे बाळासाहेब चंद्रशेखर मारुती

अनुमोदक : मा.श्री.पारखी सचिन सुभाष

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक : २२** **दिनांक : २८ / १२ /२०११.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** सावेडी जॉगींग ट्रॅक मैदान भाडेतत्वावर न देणेबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

-- ** --

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :** मा.नगरसेविका सौ.सुमनताई मोहनीराज गंधे यांचे दिनांक १४/०७/२०११ रोजीचे पत्र.

मा.नगरसेविका सौ.सुमनताई मो.गंधे यांनी सावेडी जॉगिंग ट्रॅक मैदान भाडेतत्वावर न देणेबाबत संदर्भीय पत्रानुसार कळविलेले आहे.

याबाबत शहरातील नागरीक सदरचे मैदान धार्मिक कार्यक्रमासाठी, फटाका स्टॉल करीता व इतर कार्यक्रमासाठी मागणी करत असतात त्यांना मैदान नाममात्र दरात दिल्यास मैदानाचे नुकसान होते तसेच नागरीक व लहान मुले नाराजी व्यक्त करतात परीणामी आजुबाजुला मुत्रालय व शौचालयाची व्यवस्था नसल्यामुळे समारंभासाठी येणारे नागरीक परिसराचा वापर करतात त्यामुळे सदर परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे.

तसेच सावेडी प्रोफेसर कॉलनी येथील जॉगिंग ट्रॅक मैदान भाडयाने देणेबाबत प्रशासकीय ठराव झालेला नाही परंतु सावेडी येथील क्रीडा संकुल भाडयाने देणेबाबत सभा क्रमांक ४ प्रस्ताव क्रमांक ७५ दिनांक २९/०३/२०११ चे ठरावानुसार सामाजिक संस्था, धार्मिक संस्था व इतर नागरीक यांना नाममात्र दरात सावेडी जॉगिंग ट्रॅक मैदान वापरासाठी देण्यांत येते. सावेडी येथील क्रीडा संकुल भाडयाने देणे बाबत ठरावामध्ये खालील प्रमाणे दर मंजुर आहेत.

| अ.नं. | ठिकाण | सध्याचे प्रचलित दर | प्रस्तावित दर | डिपॉझिट |
|---|---|---|---|---|
| १. | सांस्कृतिक कार्यक्रमासाठी | भाडे रु.१०००/-<br>सेवा कर रु. २/-<br>शिक्षण कर रु. १०/-<br>उपकर रु. ५/-<br>एकुण रु.११०३/- | २०००/-<br>सेवा कर<br>शिक्षणकर<br>उपकरासह. | निरंक |
| २. | व्यावसायिक कार्यक्रमासाठी | भाडे रु.५०००/-<br>सेवा कर रु.५००/-<br>शिक्षण कर रु.१०/-<br>उपकर रु. ५/-<br>एकुण रु.५,५१५/- | १००००/-<br>सेवा कर<br>शिक्षण कर<br>उपकरासह. | निरंक |

तरी सदरचे मैदान खेळाव्यतिरिक्त इतर कार्यक्रमासाठी न देणे बाबत महासभेमध्ये ठराव करणे बाबत तथा आदेशार्थ रिपोर्ट मंजुरीस्तव सादर.

यावर उप शहर अभियंता यांचा अभिप्राय की, शाखा अभियंता यांच्या प्रस्तावान्वये आदेशार्थ सादर.

यावर शहरअभियंता यांचा अभिप्राय की, मा.नगररचनाकार यांचे अभिप्रायासह सादर करा.

नगररचना विभाग. जा.क्र.टी.पी./१९५१
दिनांक १२/०९/२०११

सावेडी जॉगिंग पार्क हे नरयो क्र.४ अंभूक्रं २६८ मध्ये विद्यमान असून अहमदनगर शहराच्या २ री सुधारीत मंजूर विकास योजनेनूसार सदर जागा आरक्षण क्र. ३१ व्दारे प्राथमिक शाळा व क्रीडांगण यासाठी

आरक्षित ठेवण्यांत आलेली आहे. त्यामुळे सदर जागेचा वापर विकास योजना प्रयोजना व्यतिरिक्त इतर कारणासाठी करणे उचित होणार नाही असे या कार्यालयाचे मत आहे.

यावर उपशहरअभियंता यांचा अभिप्राय की, मा.नगररचना विभागाचे उपरोक्त अहवालानुसार आदेशार्थ सादर.

यावर शहरअभियंता यांचा अभिप्राय की, मा.नगररचनाकार यांचे "अ" अहवालानुसार मान्यता देणे योग्य.

मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्र.नगरसचिव प्रस्तावित मैदान भाडेने देणेबाबतच्या महासभेच्या मुळ ठराव तपासुन त्यासह सादर करा.

यावर प्र.नगरसचिव यांचेकडुन फेरप्रस्ताव सादर की, अहमदनगर महानगरपालिकेचे सावेडी येथील क्रीडा संकुल धार्मिक कार्यक्रमासाठी व व्यावसायिक (ऑर्केस्ट्रा) कार्यक्रमासाठी देणे बाबत " अहमदनगर महानगरपालिका क्रीडा संकुल सावेडी वापर उपविधी २००९ चे तयार केलेले प्रारुप उपविधीस मा.महासभा ठराव क्रमांक २३ दिनांक २२/०६/२०१० अन्वये मंजूरी दिलेली असून मा.महासभा ठराव क्रमांक ७५ दिनांक २३/०३/२०११ अन्वये सदर क्रीडा संकुलाचे दैनंदिन भाडे दरात वाढ करणेस मंजूरी दिलेली आहे. (सोबत- ठराव क्रमांक २३ दिनांक २२/०६/२०११)

तसेच सावेडी जॉगींग ट्रॅक मैदान भाडे तत्वावर न देणे बाबत तत्कालीन सहाय्यक आयुक्त यांनी सावेडी उपविभाग जा.क्र.२० दिनांक २६/०३/२०१० अन्वये प्रस्ताव मा.महासभेचे मंजूरीकरीता सादर केलेला असून त्यावर सध्याचे कार्यरत मा.महापौर यांनी " महासभेपुढे ठेवणेत यावे " असे सुचित केलेले आहे.

येणे प्रमाणे विनंती अहवाल सादर असे.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, सदरील प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवण्यास मा.आयुक्त यांची यापुर्वीच दिनांक २६/०२/२०१० रोजीच्या संचिकेवरील मंजुरीने शिफारस आहे. त्यास मा.महापौर यांनी विषय महासभेपुढे ठेवण्यास आदेश केले आहेत. त्यामुळे याबाबत नगरसचिव यांनी पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे. तरी त्यासंदर्भात आदेशास्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर यांचा अभिप्राय की, सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवणे.

**चर्चा :-**

मा.सौ.सुमनताई गंधे :- सावेडी येथील जॉगिंग ट्रॅक क्रीडांगणासाठी आरक्षीत जागा आहे. सर्व खेळांसाठी ठेवलेली आहे. आजमितीस सकाळ संध्याकाळ शहरातील वृध्द तरुण नागरीक या ठिकाणी फिरावयास येत असतात. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने सदर ठिकाणी जॉगिंग ट्रॅकच ठेवणे आवश्यक आहे. सदरहु मैदान कुठल्याही कार्यक्रमास वापरावयास दिल्यानंतर त्या ठिकाणी अतिशय मोठया प्रमाणात घाण साठुन दुर्गंधी सुटते पर्यायी आजुबाजुच्या नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. मैदान साफसफाई केले जात नाही. तसेच कार्यक्रमासाठी लावलेले बांबु बल्ल्या काढल्यानंतर त्या ठिकाणी खड्डे तसेच राहतात. नंतर फिरावयास येणा-या नागरिकांचे पाय त्या खड्डयामध्ये जावुन अपघात झालेले आहेत व होत आहेत. मागे महानगरपालिकेने घातलेल्या कंम्पौंड वॉलचीही नुकसान केलेले होते. तरी सदरचे मैदान हे कुठल्याही कार्यक्रमास देण्यात येवू नये त्याचा वापर फक्त जॉगिंग ट्रॅक म्हणुनच करण्यांत यावा. फटाका असोसिएशनलाही दुकाने थाटण्यासाठी सदरची जागा देण्यात येवू नये.

मा.श्री.निखिल वारे :- जॉगिंग ट्रॅक मैदानावर वर्षातुन किती कार्यक्रम होतात.

श्री.मगर शहर अभियंता :- दिवाळी सणानिमित्त सावेडी विभागात फटाका स्टॉलसाठी साधारणत: १५ दिवस सदरचे मैदान वापरावयास दिले जाते. आणि इतर उर्वरीत काळात सदर मैदानावर अंदाजे १५ ते २० कार्यक्रम होतात. ज्या संस्थांना आपण सदर मैदान वापरावयास देतो त्यांचेकडुन भाडे वसुल केले जाते. त्यामधुन आपण साफसफाई व खड्डे बुजविण्याची कामे करतो.

मा.श्री.निखिल वारे :- कार्यक्रम करणा-या संस्थेकडुन डिपॉझिट भाडे घेतले जात असुनही कार्यक्रमा नंतर मैदान साफसफाई व त्यावरील खड्डे बुजविण्याची कामे महानगरपालिके मार्फत केली जात नाहीत. त्याठिकाणी महिलां करीता व पुरुषां करीता शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही. परिणामी लोक आजुबाजूला घाण करतात. शौचालय सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. परंतु महानगरपालिकेने आज पर्यंत सुविधा दिलेली नाही.

मा.श्री.विनित पाअुलबुधे :- जॉगिंग ट्रॅक मैदानावर शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन दिली गेली पाहिजे या वारेच्या मुद्याशी मी सहमत आहे. इतर बाकीच्या गोष्टीस आमचा विरोध मंजूर करावा. सदर मैदानावर चांगल्या चांगल्या प्रकारचे मोठ मोठे सांस्कृतिक धार्मिक व इतरही कार्यक्रम होत असतात सदर मैदानाचे भाडे दरात डिपॉझिट मध्ये वाढ करावी. त्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल. सावेडी जॉगिंग ट्रॅक भाडे तत्वावर न देणे बाबतच्या विषयास आमचा विरोध नोंदवावा.

यावर त्यांनी मा.महापौर यांचे नांवे नगरसेवकांच्या सह्यांचे पत्र नगरसचिव यांचेकडेस दिले त्यामध्ये विरोधी पक्ष नेते पाअुलबुधे विनीत नाथ यांच्या यादीवर इतर ३६ नगरसेवकांच्या सह्या आहेत. सदर पत्रामधील मजकुर थोडक्यात - सदर मोकळया जागेमध्ये महानगरपालिकेतर्फे विविध सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा विषयक व व्यावसायिक कारणांसाठी भाडेतत्वावर दिली जाते.सदर उपक्रमामुळे महानगरपालिकेला मोठया प्रमाणावर उत्पन्न मिळते. सावेडी उपनगरातील मध्यवर्ती अशा असलेल्या जागेमध्ये समाजासाठी उपयुक्त असा सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा व व्यावसायिक विषयक कार्यक्रमांचे आयोजन प्रभावीपणे करणे शक्य होत आहे. तसेच समाजातील सुशिक्षीत बेरोजगारांना फटाका असोसिएशनच्या माध्यमातुन रोजगार मिळण्याची संधी प्राप्त होत आहे. त्यामुळे विषयक क्रमांक २२ ला आमचा विरोध असुन सदरचा प्रस्ताव नामंजूर करण्यात यावा हि विनंती.

मा.श्री.नितीन शेलार :- फटाका स्टॉलसाठी आवश्यक असणारी जागा सावेडी परिसरात दुसरी नसल्याने जॉगिंग ट्रॅक मैदान फटाका स्टॉलसाठी देण्यात यावे.

मा.श्री.सचिन पारखी :- सावेडी जॉगिंग ट्रॅक फटाका स्टॉल साठी १५ दिवसांच्या मुदतीवर देण्यात यावे व इतर कार्यक्रमासही त्याचा वापर करण्यात येवू नये.

मा.श्री.विनित पाअुलबुधे :- धार्मिक, सांस्कृतिक व इतरही कार्यक्रमासाठी ज्या ज्या संस्था नागरिक या मैदानाची मागणी करतील त्यांना महानगरपालिका ठरवुन देईल त्या प्रमाणे डिपॉझिट व भाडे आकारणी करुन वापरावयास देण्यात यावे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- सावेडी जॉगिंग ट्रॅक करीता उपनगरातील नगरसेवकांची समिती नेमावी त्यात आयुक्त उपायुक्तांचा समावेश करावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- सावेडी जॉगिंग ट्रॅक मैदान सर्वांना उपलब्ध करुन द्यावे.

मा.सौ.संगिता खरमाळे :- सावेडी जॉगिंग ट्रॅक मैदान आवश्यक आहे. फटाका स्टॉलसाठी भाडे तत्वावर देण्यात यावे. महानगरपालिकेस त्यापासुन उत्पन्न मिळेल. त्या उत्पन्नातुन साफसफाई करण्यात यावी. या परिसरात दुसरी कुठलिही अशी मोठी जागा नाही.

मा.श्री.अंबादास पंधाडे :- श्रीमती.संगिता खरमाळे व निखिल वारे यांनी सुचविलेले योग्य व बरोबर आहे. महानगरपालिकेने भाडयात वाढ करावी. फटाका स्टॉलसाठी सलग १५ दिवस जागा भाडे तत्वावर देता येते का ? याबाबत अभ्यास करुन निर्णय घ्यावा.

मा.श्री.बाळासाहेब पवार :- सावेडी जॉगिंग ट्रॅक मैदान भाडयाने देणे बाबत कमिटी न नेमता सदर जॉगिंग ट्रॅक सुशोभिकरण करणेसाठी कमिटी नेमण्यांत यावी. जेणेकरुन मैदानाची शोभा वाढेल व येणा-या नागरिकांना चांगल्या सुविधा दिल्या जातील.

मा.महापौर :- मा.सभेतील सर्व नगरसेवकांच्या या विषयीच्या भावना लक्षात घेता सदरचा विषय स्थगित ठेवावा. मैदानाच्या स्वच्छतेबाबत संबंधितांना सुचना देण्यांत याव्यात. या नंतर येणा-या तक्रारीं बाबत तात्काळ दखल घेतली जाईल.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे : सदर मैदानाच्या भाडे दरात वाढ करणेत यावी.

**ठराव :-**

सावेडी जॉगींग ट्रॅक मैदान भाडेतत्वावर न देणेबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावाबाबत सभागृहात झालेल्या व्यापक चर्चेवरुन ठरविणेत येते की, सदरचा विषय स्थगीत ठेवणेत यावा. मैदान वापरानंतरच्या स्वच्छते बाबत दक्षता घेण्यांत यावी. भाडे दरात वाढ करणे बाबतचा प्रस्ताव सन २०१२-२०१३ या अर्थसंकल्पाच्या प्रस्तावात सादर करावा.

सुचक : मा.श्री.बोराटे बाळासाहेब मारुतीराव

अनुमोदक : मा.श्री.शेलार नितीन शिवाजी

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : २३** **दिनांक : २८ / १२ /२०११.**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदाना बाबत झालेल्या करारनामा व त्याप्रमाणे पात्र प्रत्येकी रु.६०००/- इतका सानुग्रह अनुदान खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :** महानगरपालिका पदाधिकारी ,प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये सानुग्रह अनुदाना बाबत झालेल्या अटी व शर्ती नुसार करारनामा.

अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांनी त्यांचे कडील जा.क्र.३४ / श्रमिक /२०११ दिनांक ५/९/२०११ अन्वये संप नोटिस देवुन खालील प्रमाणे मागण्या करण्यांत आलेल्या होत्या.

१.दि.२६ ऑक्टोबर २०११ रोजी दिवाळी सण असल्याने महानगरपालिकेतील सर्व कामगारांना सन २०१०-२०११ या सालासाठी त्यांच्या भत्यासह होणा-या वार्षीक मिळकतीच्या २०% बोनस म्हणुन दिवाळी सणापुर्वी अदा करण्यांत यावा.

२.महापालिकेतील सर्व कामगारांना दिवाळी सणासाठी सानुग्रह अनुदानापोटी रक्कम रु.१५,०००/- (अक्षरी रु.पंधरा हजार मात्र) दिवाळीपुर्वी विनाअट देण्यांत यावा.

सदर परिशिष्टांमध्ये युनियन यांनी नमुद केलेल्या मागण्या पाहाता त्या आर्थिक व धोरणात्मक स्वरुपाच्या बाबी असल्याने सदर बाबत महानगरपालिका प्रशासन व कामगार युनियन यांचे समवेत संयुक्त बैठकीमध्ये चर्चा होवुन सदर विषया बाबत कार्यवाही करिता निर्णय होणे अपेक्षित असल्याने जा.क्र.आस्थापना १७२२ दिनांक १४/९/२०११ अन्वये कामगार युनियन यांना पत्र देवुन महानगरपालिका प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये चर्चा करणे कामी दिनांक १७/९/२०११ रोजी संयुक्त बैठक आयोजित करण्यांत आलेली होती.

अहमदनगर महानगरपालिका प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये दिनांक १७/९/२०११ रोजी झालेल्या संयुक्त बैठकीमध्ये मागणी क्रमांक १ दिवाळी बोनस बाबत मा.शासन स्तरावर कुठलाच निर्णय झालेला नाही त्यामुळे या बाबत शासन स्तरावरील निर्णयानंतर उचित कार्यवाही करण्यांत येईल.तसेच मागणी क्रमांक २ बाबत आर्थिक परिस्थिती बिकट असल्याचे सांगण्यांत आले बाबत जा.क्र.आस्था. १८१३ दिनांक २०/९/२०११ च्या इतिवृत्ती नुसार महानगरपालिका कामगार युनियन यांना कळविण्यांत आलेले होते.

परंतु सदर संयुक्त बैठकीमध्ये महानगरपालिका कामगार युनियन पदाधिकारी ठाम राहिल्याने निर्णय झाला नव्हता.

तद्नंतर या करिता महानगरपालिका प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये दिनांक २७/९/२०११ रोजी पुनश्चः संयुक्त बैठक आयोजित करण्यांत येत असले बाबत जा.क्र.आस्था. १८२६ दिनांक २२ /०९ /२०११ अन्वये कळविण्यांत आलेले होते.तथापि कामगार युनियन यांचे दिनांक २३/९/२०११ चे पत्रा नुसार सदरची संयुक्त बैठक ही दिनांक ४/१०/२०११ रोजी आयोजीत करण्यांत येत असल्या बाबत जा.क्र.आस्था.विभाग १९०१ दिनांक २९/९/२०११ अन्वये कामगार युनियन यांना कळविण्यांत आले होते.परंतु सदरच्या संयुक्त बैठकीमध्येही अपेक्षित निर्णय होवु शकला नाही.

दरम्यानच्या काळात मा.सहाय्यक कामगार आयुक्त,अहमदनगर यांचेकडे महानगरपालिका युनियन यांचे दिनांक ५/९/२०११ च्या संप नोटीसाच्या अनुषंगाने सुनावणी होवुन त्यामध्ये महानगरपालिका प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये संयुक्त बैठका आयोजित करण्यांत येत असल्या बाबत अवगत करण्यांत येत होते.

त्यानंतर महानगरपालिका कामगार युनियन यांनी त्यांचे कडील जा.क्र.४०/श्रमिक/२०११ दिनांक १२/१०/२०११ च्या पत्रान्वये महानगरपालिकेतील कामगारांनी दिनांक १४ ऑक्टोबर २०११ रोजी पासुन महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारती समोर बेमुदत धरणे आंदोलन सुरु केलेले होते.

सदर बाबत अहमदनगरचे मा.सहाय्यक कामगार आयुक्तचा चार्ज नाशिकचे सहाय्यक कामगार आयुक्त यांचेकडे असल्याने त्यांनी गेल्या तीन दिवसा पासुन युनियन व प्रशासन यांना दुरध्वनीवर संपर्क साधुन समेट घडविण्यामध्ये भागिदरी केली ही समेट कारवाई चालु असतांना दिवाळी नजीक आली असल्याने महानगरपालिका प्रशासन ,पदाधिकारी व युनियन यांचेमध्ये दिनांक १७/१०/२०११ रोजी संयुक्त बैठक झाली त्यामध्ये बोनस व सानुग्रह अनुदानाच्या मागणीवर अंतीम चर्चा झाली सदर बैठकीमध्ये मा.आयुक्त ,मा.उप-आयुक्त (सा) ,मा.मुख्य लेखाधिकारी ,मा.सहाय्यक आयुक्त आस्थापना प्रमुख तसेच कामगार युनियनच्या वतीने अध्यक्ष,मा.श्री.अंनत लोखंडे,सरचिटणीस ,मा.श्री.आनंदराव वायकर कार्याध्यक्ष श्री.बाबा मुदगल , उपाध्यक्ष राधाजी सोनवणे ,विठ्ठल उमाप ,डी.यु.देशमुख,व तसेच सहचिटणीस मा.कॉ. नंदु डहाणे , व इतर सदस्य उपस्थित होते.या बैठकीमध्ये यांचेमध्ये प्रदिर्घ चर्चा नंतर महानगरपालिका पदाधिकारी ,प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये खालील शर्ती व अटीवर करार करण्याचे ठरले त्यानुसार करार करण्यांत आलेला असुन तो औद्योगिक विवाद अधिनियमान्वये चालु असलेल्या समेट कारवाई मध्ये दाखल करण्याचे तसेच हा करार मा.महासभेच्या कार्योत्तर मंजुरीच्या अधिन राहुन उभयपक्षी मंजुरी देण्यांत आली. **(सोबत : औद्योगिक विवाद १९४७ च्या कलम १२(३) अन्वये अहमदनगर महानगरपालिका पदाधिकारी,प्रशासन व महानगरपालिका कामगार युनियन यांचेमध्ये रुपये १००/- च्या मुदांकावर झालेल्या करारनामाची स्वाक्षरीची मुळ प्रत.)**

**कराराच्या अटी व शर्ती**

१) दिनांक २६/१०/२०११ पासुन सुरु होणा-या दिवाळी पुर्वी म्हणजेच दिनांक २१/१०/२०११ पर्यत महानगरपालिकेच्या कायम सेवेत असणा-या प्रत्येक पात्र कामगार कर्मचा-यांस (परिविक्षाधीन व प्रतिनियुक्ती वरील कर्मचारी यांचे सह) विना अट प्रत्येकी रुपये ६,०००/- (अक्षरी रुपये सहा हजार मात्र) सानुग्रह अनुदान म्हणुन देण्यांत येतील .

२) या सानुग्रह रक्कम रुपये ६,०००/-पैकी रक्कम रु.३,०००/- दिनांक २१/१०/२०११ पर्यत कामगारांना देण्यांत येतील तसेच उर्वरीत ३,०००/- ही रक्कम दिनांक ३०/११/२०११ पुर्वी कामगारांना देण्यांत येतील.

३) महाराष्ट्र शासनाने बोनस व सानुग्रह म्हणुन सन २०११-१२ सालासाठी या पेक्षा अधिक रक्कम म्हणुन किंवा सानुग्रह अनुदान देण्याचे ठरविले ,किंवा शासनाच्या आक्षेप आला तर त्या बाबत युनियनशी चर्चा करुन या बाबत निर्णय घेण्यांत येईल.

४) वरील शर्त नं.१ ही दिनांक ५/९/२०११ युनियनच्या संप नोटिशीच्या परिशिष्टामध्ये सर्व मागण्या बाबत व अंतीम करार आहे.असे समजण्यांत येईल .सदर करार हा सन २०११-२०१२ साठी असुन तो पुढील काळात बंधनकारक राहणार नाही.

५) हा करार महानगरपालिकेतील सर्व कामगार कर्मचा-यांवर बंधनकारक राहील या उपरही एखाद्या कर्मचा-याने सदर करारा बाबत आक्षेप घेतल्यास अथवा हरकत घेतल्यास त्यास या कराराचे फायदे मिळणार नाहीत.

६) या कराराचा लाभ घेणा-या प्रत्येक कामगार कर्मचा-यास या सानुग्रह अनुदानातुन प्रत्येकी रु.२००/- युनियन निधी म्हणुन वेतन प्रदान अधिनियम १९३६ चे कलम ७(२) (केकेके) अन्वये वेतन पटातुन कपात करण्यांत येईल व ही रक्कम दिनांक २१/१०/२०११ रोजीच्या रु.३०००/- रकमेतुन कपात केली जाईल.कपाती पासुन एक आठवड्याच्या आंत युनियनला चेकने देण्यांत येईल.

मा.सहाय्यक कामगार आयुक्त,अहमदनगर यांचे कडेस महानगरपालिका कामगार युनियन यांनी दिनांक ५/९/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या संप नोटिस प्रकरणी समेट कार्यवाही बाबत दिनांक २१/१०/२०११ रोजी कामगार विभागा मार्फत मा.सहाय्यक आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका व अध्यक्ष , महानगरपालिका कामगार युनियन यांनी समक्ष उपस्थित राहुन वरील करार पत्रा बाबत दाखल होवुन कार्यवाही पुर्तता केलेली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०११-१२ या अर्थिक वर्षा करिता सानुग्रह अनुदाना पोटी रक्कम रु.५,००,०००/- (अक्षरी पाच लाख ) इतकी तरतुद करण्यांत आलेली आहे.

वरील प्रमाणे झालेल्या करारा मधील अट व शर्त क्रमांक २ प्रमाणे अहमदनगर महानगरपालिके मधील कर्मचा-यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान रक्कम रुपये ६०००/- इतक्या पोटी माहे ऑक्टोबर २०११ या महिन्यांत पात्र ठरणा-या प्रत्येक कर्मचा-यास सदर करारा नुसार रु.३०००/- रक्कम म्हणुन अदा करण्यांत आलेली असुन त्यापोटी रक्कम रु.६७,९५,८५०/-(अक्षरी रुपये सदुसष्ट लाख पंच्यान्नव हजार आठशे पन्नास मात्र ) इतका खर्च झालेला आहे.

तसेच अट व शर्त क्रमांक ६ नुसार महानगरपालिकेमधील कर्मचा-यांच्या वरिल सानुग्रह अनुदाना रक्कम रु.६०००/- पोटी अदा करण्यांत आलेल्या रुपये ३०००/- देयक बिला मधुन प्रत्येकी रुपये २००/- प्रमाणे युनियन निधी म्हणुन कपाती बाबतची कार्यवाही झालेली आहे.

अहमदनगर महानगरपालिका पदाधिकारी प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये झालेल्या करारा मधील अटी व शर्ती नुसार अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना दिवाळी सणा निमित्त सानुग्रह अनुदाना बाबत नमुद केल्या प्रमाणे सदर करारास व प्रत्येकी रक्कम रु.६०००/- इतका सानुग्रह अनुदान बाबतच्या कार्यवाहीस मा.महासभेची कार्योत्तर मंजुरी मिळणे आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवणे आवश्यक आहे.

तरी अहमदनगर महानगरपालिका पदाधिकारी ,प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये झालेल्या अटी व शर्ती नुसार सदर करारनामास व त्यानुसार अहमदनगर महानगरपालिके मधील पात्र कर्मचा-यांना दिवाळी सणा निमित्त सानुग्रह अनुदान प्रत्येकी रक्कम रु.६०००/- इतका अदा बाबतच्या प्रस्तावास व खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणे आवश्यक असल्याने मा.महासभेकडे सदरचा प्रस्ताव पाठविणे करीता मा.मुख्य लेखा परिक्षक व मा.मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय होवुन मंजुरीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक/मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे सदर प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेकरीता मा.महासभेपुढे ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित "अ" प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

चर्चा :-

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- महानगरपालिका कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित्त देण्यांत येणारे सानुग्रह अनुदान दोन टप्प्यात देणे बाबत करार केलेला आहे. महानगरपालिके मधुन सन २०१०-२०११ मध्ये किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या पात्र कर्मचा-यांनाही सानुग्रह अनुदान देण्यात यावे.

मा.श्री.संजय चोपडा :- दिनांक ०१/०४/२०११ नंतर सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांनाही सानुग्रह अनुदान देण्यांत यावे.

मा.सौ.संगिता खरमाळे :- महानगरपालिका कर्मचारी अधिकारी यांना सानुग्रह अनुदान द्यावे त्याच बरोबर ठेकेदारांचे थकीत बीले सिनियॉरिटी प्रमाणे देणे बाबत कार्यवाही करावी. संबंधित ठेकेदारांना कामांची बिले वेळेवर न मिळाल्याने आमच्या वॉर्डामध्ये कामे करण्यासाठी कोणताही ठेकेदार तयार होत नाही.

मा.श्री.किशोर डागवाले :- मा.महापौर सो यांनी सर्वसाधारण सभेमध्ये दिलेल्या आदेशांची नंतरच्या काळात अंमलबजावणी होते कींवा नाही याबाबतची पहाणी करावी. वॉर्डातील विविध विकास कामांचा पाहणी अहवाल अद्यापपर्यंत रद्द झालेला नाही. यामुळे कामांच्या वर्क ऑर्डर वेळेत होवू शकत नाहीत. आपल्या निर्णयांची अंमलबजावणी होते कींवा नाही याची माहिती घ्यावी.

मा.आयुक्त सो :- मागील सभेतील विषयपत्रिकेवर काम पाहणी अहवाल रद्द करणे बाबत विषय घेतलेला नव्हता सर्व साधारण सभेमध्ये त्याची फक्त चर्चा घडुन आलेली आहे. वॉर्डातील कुठलेही काम दुबार होवू नये याकरीता पाहणी अहवाल आवश्यक आहे. पाहणी अहवाल रद्द करणे बाबतची कार्यवाही प्रशासकीय स्वरुपाची आहे.

मा.श्री.किशोर डागवाले :- यापुर्वी वॉर्डातील कामे करतांना पाहणी अहवाल नसतांनाही कुठलेही काम डबल झालेले नाही. पाहणी अहवाल रद्द करणेत यावा.

मा.आयुक्त :- पाहणी अहवालामुळे कुठलेही काम डबल होत नाही. ही नगरसेवकांची जबाबदारी नाही. पाहणी अहवालावर सह्या करणारांची जबाबदारी आहे. पाहणी अहवाल रद्द करणे बाबत निर्णय घेण्याचे काम चालू आहे.

मा.श्री.किशोर डागवाले :- महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने अंडर ग्राउंड केबल टाकणेसाठी ६ महिन्यापुर्वी रस्ता खोदाई केलेली आहे. त्यावर काय कार्यवाही केली.

मा.श्री.संग्राम जगताप :- वॉर्डातील विकास कामांबाबतचा पाहणी अहवाल रद्द करणे बाबत मा.महापौर सो यांनी मागील सर्वसाधारण सभेत पाहणी अहवाल आजपासुन रद्द करण्यांत आलेला आहे असे सांगुनही अद्यापपर्यंत पाहणी अहवाल रद्द करणेत आलेला नाही. मा.महापौरांच्या आदेशाचे पालन केले जात नाही.

मा.श्री.विनित पाउलबुधे :- कुठलेही काम दुबार होत नाही. तसे असेल तर मा.आयुक्त सो यांनी कुठल्याही कामावर अचानक भेटी द्याव्यात.

मा.सौ.किरण उनवणे :- पाहणी अहवालामुळे वॉर्डातील कित्येक कामे अडथळुन पडलेली आहेत. पाहणी करण्यासाठी कुणीही येत नाही. भारस्कर कॉलनी नाला पाहणी करणेकरीता कुणीही आलेले नाही.

मा.आयुक्त :- पाहणी अहवाल आठ दिवसात देणे बाबत आदेश दिलेले आहेत. सद्यस्थितीत कामाची गरज व यापुर्वी त्या ठिकाणी ते काम केंव्हा झालेले आहे. याबाबत प्रमाणपत्र करणे चालू आहे.

मा.महापौर :- पाहणी अहवाल रद्द करण्यांत येत आहे.

मा.श्री.विनित पाउलबुधे :- दिनांक २२/०६/२०१० च्या सर्व साधारण सभेत नगरसचिव पदी नेमणुकीचा विषय घेण्यात आलेला होता. त्यामध्ये प्रशासनाने नगरसचिव पदासाठी जाहीरात देवुन आलेल्या उमेदवारांची लेखी, तोंडी परीक्षा घेवुन उमेदवारांची निवड केलेली होती. त्यामध्ये

सभाकामकाजाचा अनुभव असलेल्या अटीचा विचार करण्यांत आलेला नव्हता त्यामुळे सर्व साधारण सभेत सर्व नगरसेवकांनी झालेली संपुर्ण निवड प्रक्रीया रद्द करुन पुन्हा नव्याने जाहीरात देवुन नव्याने निवड प्रक्रीया करण्याबाबत सुचविलेले होते. श्री.शित्रे त्यावेळी सर्व साधारण सभेने अपात्र ठरविलेले असतांना आज ते नगरसचिव पदासाठी पात्र कसे ठरविले गेले. त्यांची नेमणुक कशी केली गेली.

मा.सौ.संगिता खरमाळे :- अशा प्रभारी कामकाजामुळे सदरचे कर्मचारी त्यांचे कामाचे आदेश घेवुन कोर्टात जातात यामुळे महानगरपालिकेसही कोर्ट कामकाजासाठी जनतेचा पैसा खर्च करावा लागतो.

मा.श्री.निखिल वारे :- कर्मचारी कोर्टात गेल्यानंतर जनतेचा पैसा खर्च होतो. ५०६ कर्मचा-यांच्या कोर्ट केस कामी महानगरपालिकेस बराचसा खर्च करावा लागलेला आहे.

मा.श्री.विनित पाउलबुधे :- श्री.शित्रे यांना नगरसचिव पदाचा प्रभारी कार्यभार दिलेला आहे. परंतु सेवाजेष्ठता यादी पाहता नगरसचिव पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता धारण करणारे काही कर्मचारी श्री.शित्रे यांना सेवाजेष्ठ आहेत. त्यांना डावलुन शित्रे यांना प्रभारी नगरसचिव कसे दिले गेले.

मा.आयुक्त :- नगरसचिव पदासाठी सन २०१० मध्ये राबविण्यांत आलेली निवड प्रक्रीये बाबत सर्व बाबी पुन:श्च तपासणेत याव्यात व महासभेपुढे प्रस्ताव सादर करावा असा विषय झालेला आहे. श्री.शित्रे यांना पदोन्नती देण्यांत आलेली नाही. त्यांची नियुक्ती केलेली नाही. प्रशासन चांगल्या प्रकारे काम करणा-या कर्मचा-यास प्रभारी काम देत आहे. त्यामुळे येथे सेवाजेष्ठतेचा प्रश्न येत नाही. काम पाहुन काम दिले जाते. पदोन्नती नसल्याने पात्रतेची आवश्यकता नाही. ठरावाची अंमलबजावणी आकृतीबंध शासनाकडुन मंजूर होवुन आल्यानंतर करावयाचे आहे.

मा.श्री.विनित पाउलबुधे :- कुठल्याही विभागाचा प्रभारी चार्ज देतांना शैक्षणिक पात्रता व सेवाजेष्ठता याचा विचार करावा.

---*---

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिके मधील कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदाना बाबत झालेल्या करारनाम्यास व त्याप्रमाणे पात्र प्रत्येकी रु.६०००/- इतका सानुग्रह अनुदान खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे. प्रस्ताव मंजूर. खर्च मंजूर.

तसेच सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षामध्ये कार्यरत असलेले किंवा सदर वर्षामध्ये अथवा लगतच्या वर्षामध्ये सेवानिवृत्त अथवा मयत झालेल्या कर्मचा-यांच्या पात्र वारसास भविष्यात लेखापरीक्षणात आक्षेप निर्माण झाल्यास त्याबाबतचे वसूलीचे हमीपत्र घेवून प्रत्येकी रु.६०००/- किंवा त्यांचे कार्यरत सेवाकाळानुसार सानुग्रह अनुदान देण्यास मा.महासभा सर्वानुमते मंजूरी देत आहे. त्याकामी येणा-या खर्चास मंजूरी देत आहे. याप्रमाणे आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री.वाकळे बाबासाहेब सोन्याबापू
अनुमोदक : मा.श्री.चोपडा संजय फुलचंद
ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.